


# गायीच्या दूध दरात एक रूपयाने वाढ

मुंबई (प्रतिनिधी)ः नव्या वर्षातशेतकऱ्यांच्यासाठी नवी भेट मिळालेली आहे. गायीच्या दूध दरात १ रूपयाने वाढ करण्यात आलेली आहे. तर ११ तारखेपासून म्हशीच्या दूध दरात २ रूपये वाढ करण्यात येणार आहे. महानंद, वारणा, कृष्णा, राजहंस, नंदन, या दूध उत्पादक कंपन्यांनी दुधाची दर वाढ करण्याचा निर्णय जाहीर केला आहे.

गेल्या कागी दिवासापासून दूध उत्पादक शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च वाढलेला होता. सरकारने दूध उत्पादकांना १ रूपयाची दरवाढ देऊन दिलासा दिलेला आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे खासदार राजू शेट्टी यांनीही लातूर येथे दूध आंदोलन करण्याचा इशारा दिलेला होता. अजून म्हैशीच्या दूध दर वाढीची घोषणा अद्याप झालेली नाही. ११ तारखेला ही दरवाढ अपेक्षित आहे. दि. ११पासून दूध विक्रीतही एक रूपयाची दरवाढ झालेली आहे. आता मुंबईमध्ये गायीचे दूध २७ रूपये प्रतिलिटर झालेली आहे. मुंबईत दररोज सुमारे ४५ लाख लिटर दुधाची मागणी असताना प्रत्यक्षात २० लाख लिटर दुधाचा पुरवठा होतो. मागणी जास्त आणि पुरवठा कमी आहे. शिवाय पेट्रोल आणि डिझेलचे दर महाग झाल्याने दुधाच्या प्रक्रिया खर्चात वाढ झालेली आहे. दुधाचे दर वाढल्याने दही, खवा, पेढे, एनर्जी, चीज, पनीर, लोणी, श्रीखंड, चॉकलेट, आईस्क्रिम आदी दुग्धजन्य पदार्थही महाद होणार आहेत.

स्वाभिमानी विचार

Book-Post

प्रति,

RNI No. - MAH/MAR/2005/16213
Rgd. No.L2/17/RNP/ K.L.P/234/09-11

वर्ष ६ अंक ४ १५ जानेवारी २०११ किंमत ५ रुपये पाने २०

# स्वाभिमानी विचार

RNI NO-MAH/MAR/2005/16213
REGD NO - K.L.P/234/09-11
संपादक : खासदार राजू शेट्टी

# अलमट्टीविरोधात जनआंदोलन



## खासदार राजू शेट्टी : कृष्णा खोरे कृती समितीची स्थापना करणार



जयसिंगपूर (स्वाभिमानी वृत्तसेवा)ः अलमट्टी विरोधात वाढविली जाणारी उंची दक्षिण महाराष्ट्रासाठी काळ ठरणार आहे. शेती, घरे - दारे, माणसे सर्वकाही उदध्वस्त होणार आहे. याविरोधात स्वाभिमानी शेतकरी संघटनेतर्फे कृष्णा खोरे बचाव कृती समिती स्थापन करून मोठे जनआंदोलन उभे केले जाईल तसेच या प्रश्नावर मी संसदेतही आवाज उठवून जलआयोगाकडे तक्रार करणार आहे, अशी माहिती स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते खासदार राजू शेट्टी यांनी दिली.

खा. शेट्टी म्हणाले, अलमट्टी धरणाची उंची वाढविण्यास दिलेली परवानगी अत्यंत धोकादायक आहे. महाराष्ट्राने अलमट्टीतील पाणी पातळी ५१२ मीटर ठेवावी, अशी मागणी करूनही लवादाने दुर्लक्ष केले आहे. या धरणात ५१८ मीटर उंचीला पाणी साठले की काय होते, याचा गंभीर पान ३ वर ▸



# अलमट्टीच्या उंचीला विरोध करा

कृष्णा लवादाने अलमट्टीची उंची ५१९ मीटर वरून ५२४ मीटर वर करण्यासाठी मान्यता दिली नि तमाम पश्चिम महाराष्ट्रातील जनतेच्या पोटात भितीचा गोळा उठला. सन २००५ व २००६ साली आलेल्या भयंकर महापुराच्या आठवणी ताज्या असतानाच यंदाही महापुराचे भीषण तांडव समोर येऊन ठाकले आहे. कारण तसेच आहे, ते म्हणजे अलमट्टीच्या उंचीस ५२४ पर्यंत वाढविण्यास परवानगी दिल्याची.

याविरोधात स्वाभिमानी शेतकरी संघटनेने नुकतेच दंड थोपटले आहे. संघटनेची माध्यमातून राज्यव्यापी लढा उभारण्याचा इशारा खासदार राजू शेट्टी यांनी मुकताच दिलेला आहे. सर्वप्रथम विचार केल्यास अलमट्टीची उंचीची भिती नाही. पण कृष्णेच्या वाहणाऱ्या संथ प्रवाहाची भिती आहे. २००५ साली कृष्णा नदीने सांगली, कोल्हापूर जिल्ह्याला आपल्या कवेत घेतले होते. मोठ्या प्रमाणात जीवित व वित्त हानी झालेली होती. नेत संसार उद्ध्वस्त झालेले होते. या आठवणी ताज्या असतानाच कृष्णा लवादाच्या निर्णयाने तमाम सांगली, कोल्हापूर जिल्ह्यातील पूरग्रस्त भागातील नागरिकांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. सांगली ते अलमट्टी धरणाचे एकूण अंतर आहे २६४ किलोमीटर आणि हे अंतर पार करत कृष्णा नदी अनेक अडथळ्यांना तोंड देऊन प्रवास करत असते. अलमट्टीची सध्याची पाणी साठवण क्षमता १२८ टीएमसी आहे. उंची ६ मीटरने वाढणार आहे. त्यामुळे त्याचा परीघ वाढणार आहे. म्हणजेच पाण्याचा उतार वाढणार आहे. पाणी अतिशय संथ गतीने वाहणार आहे. अलमट्टी पूर्ण क्षमतेने भरल्यास सांगली, कोल्हापूर जिल्हा पूर्णपणे उद्ध्वस्त होईल. या अलमट्टीच्या उंचीने सांगली, कोल्हापूर जिल्हा मस्य शेती म्हणून ओळखले जाईल. वर्षोनुवर्षे वसलेली गावे उद्ध्वस्त होतील. अलमट्टी धरणाची समुद्रसपाटी पासूनची उंची नि सांगलीची उंची यामध्ये केवळ ४० मीटरची तफावत आहे. म्हणजे सांगली ते अलमट्टी च्या २६४ किलोमीटर अंतरात केवळ ४० मीटरचा उतार आहे. उंची वाढल्यास हा उतार कमी होणार आहे. त्यामुळे पाणी अतिशय संथ गतीने वाहणार आहे. सुजलाम् व सुफलाम् असलेला पश्चिम महाराष्ट्र उद्ध्वस्त करण्याचे मनसुबे काही जणांनी केला आहे.

सर्वाच जास्त हानी ही शिरोळ तालुक्याला बसणार आहे. हजारो गावे उद्ध्वस्त होणार आहेत. याची काळजी कुणालाच कळी काय नाही.मूठभर लोकांच्या भल्यासाठी सांगली, कोल्हापूर जिल्हा कोणी उद्ध्वस्त करणार असेल तर स्वाभिमानी शेतकरी संघटना हे कदापि खपवून घेणार नाही. पूरग्रस्तांनी अनेक मरणयातना भोगलेल्या आहेत. आता कुठे संसार उभे राहत आहेत. हे होत असताना त्यांना पुढील महापुराची भिती आता पासूनच घालणे म्हणजे येथून जावा अथवा पुरात मरा. असेच त्यांचे म्हणणे आहे. अलमट्टीची उंची भिती बाळगण्याचे काही कारण नाही. कारण पूर त्याने येणार नाही. असे सत्ताधारी सांगत आहेत. मात्र कोणी काहीही सांगो. उंची वाढल्यास महापूर येणार हे नक्की आहे. अतिवृष्टी झाल्यास पूर तर येणार आहे. कृष्णाकाठावर वसलेली शेती व घरे उद्ध्वस्त होणार आहे. मग याला जबाबदार कोण? राज्य शाससाने कृष्णा लवादासमोर आपली बाजू नीट पान ३ वर ▶

◆ वर्ष ६ ◆ अंक ४ ◆१५ जानेवारी २०११ ◆ **संपादक :** खासदार राजू शेट्टी Email : rajushetti@gmail.com
◆ **कार्यकारी संपादक : डॉ. महावीर अक्कोळे ◆ सहसंपादक : डॉ. श्रीवर्धन पाटील, जगदीश इनामदार,**
◆**मानद सल्लागार : मा. श्री. अण्णा** हजारे राळेगणसिद्धी, **न्या. पी. बी. सावंत** पुणे, **न्या.बी.जी.कोळसे पाटील** पुणे, . **प्रा. शरद पाटील** सांगली, **कुमार सप्तर्षी** पुणे, **माजी आमदार. वामनराव चटप** चंद्रपूर
◆ **व्यवस्थापक :** सुभाष शेट्टी ◆ **कार्यालय :** भरत पतसंस्थेच्या माडीवर, पोलीस स्टेशनसमोर, जयसिंगपूर, ता. शिरोळ. फोन : (०२३२२) २२४३२७

**SWABHIMANI VICHAR (Fortnightly)** स्वाभिमानी प्रतिष्ठान संचलित पाक्षिक स्वाभिमानी विचार हे पत्र संपादक ✻खासदार राजू उर्फ देवाप्पा आण्णा शेट्टी यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, राधाबाई रोड, पोलिस स्टेशननजीक, जयसिंगपूर-४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर, (महाराष्ट्र राज्य) येथे प्रकाशित केले. प्रकाशन स्थळ : स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, राधाबाई रोड, जयसिंगपूर-४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर (महाराष्ट्र राज्य). दूरध्वनी : (०२३२२) २२४३२७. मुद्रण स्थळ : सुनील प्रिंटर्स, जयसिंगपूर. फोन (०२३२२) २२४३२७ पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी ✻ यांची आहे. पाक्षिक स्वाभिमानी विचारमधील सर्व लेखांचे हक्क राखून ठेवण्यात आलेले आहेत. **Decleration No. Desk No. VII Home N.P.S.R./58/2005 RNI No. MAH/MAR/2005/16213 या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.**

वार्षिक वर्गणी
रु. १००/-

## अलमट्टीच्या उंचीलाविरोध करा

▶ पान २ वरून

नांडलेली नाही. कर्नाटकने आपली बाजू मांडताना महाराष्ट्रातील नद्यावरील व ओढ्यावरील झालेली अतिक्रमणे ही कारणे दिलेली आहेत. त्यामुळेच महापूर येतो असे त्यांचे म्हणणे आहे. हे म्हणणे लवादाने मान्य देखील केले. हे मान्य करताना राज्य शासन झोपा काढत होते काय? कारण वाढणारी उंची म्हणजे सांगली, कोल्हापूर जिल्ह्यातील कृष्णाकाठच्या ग्रामस्थांचे मरण आहे. कर्नाटक शासनाने अलमट्टी उंची वाढविण्याची मनसुबे अजिबात पाहू नये. कारण उंची वाढल्यास १०० टीएमसी चा अतिरिक्त साठा होणार आहे. ते पाणी कुठे सोडणार? याचे उत्तर कर्नाटक शासनाकडे नाही. १०० टीएमसीच्या साठ्याने सांगली, कोल्हापूर जिल्हा जलमय होणार आहे. एक इंच जरी उंची वाढल्यास याचे गंभीर परिणाम कर्नाटक सरकारला भोगावे लागतील. हे त्यांनी धान्यात ठेवावे.

# अलमट्टीविरोधात **जनआंदोलन**

▶ पान १ वरून

दुष्परिणाम पश्चिम महाराष्ट्राने २००५ व २००६ साली अमुभवले आहे. त्यामुळे उंची वाढविल्यास काही होणार नाही, असे म्हणणे पूर्णपणे चुकीचे आहे. खरेतर ५१९ वरून ५२४ मीटर अशी उंची वाढल्याने अलमट्टीत तब्बल १०० टीएमसी असा मोठ्या प्रमाणात पाणीसाठा होणार आहे. इतके पाणी सप्टेंबरमध्ये अडवून साठणार नाही, मात्र ऑगस्टमध्ये साठा सुरू केल्यास महापूर येईल. ते पुढे म्हणाले, सांगली ते अलमट्टी हे अंतर २६४ किलोमीटर आहे, तर राजापूर येथे मदीचा तळ समुद्रसपाटीपासून ५१९ मीटर उंच आहे. म्हैशाळ येथे ५२२ तर सांगलीत ५२९ मीटर उंच आहे. याठिकाणाहून पाण्याचा स्लोप केवळ चार मीटर आहे. म्हणजे ६६ किलोमीटरला फक्त एक मीटर हा स्लोप नगण्य आहे. यामुळे पाण्याचा प्रवाह मंदावतो, याउलट कृष्णा खोऱ्यातील कृष्णेसह वारणा, कोयना, पंचगंगा, दूधगंगा, वेदगंगा या नद्यांचे नृसिंहवाडीपर्यंत अंतर १०० ते १२५ किलोमीटर आहे. त्यामुळे पावसाळ्यात वेगाने पाणी येते. राजापूर बंधाऱ्याजवळ पाण्याचा विसर्ग १६ टीएमसी इतका असतो. पण अलमट्टीच्या फुगवट्यामुळे हे पाणी पुढे सरकत नाही. परिणामी महापूर येतो. आठवड्याभरातून सांगली, कोल्हापूर जिल्ह्यात व सीमाभागात बैठक घेऊन आंदोलनाची दिशा निश्चित केली जाईल, असे त्यांनी सांगितले.

TEXMO INDUSTRIES
५२ वर्षांची विश्वासाची परंपरा
Taro
SKF Ball Bearings
जैन एच.डी.पी.ई. पाईप्स
BCH स्टार्टर

अधिकृत विक्रेते
बाहुबली इलेक्ट्रिकल्स
आझाद रोड, ८वी गल्ली,जयसिंगपूर.
फोन:(०२३२२)२२५९०५,२२७४०५ मोबा.:९४२११७३१४७
गोमटेश इलेक्ट्रिकल्स
जामे मस्जिद समोर, मेट्रो ऑटोजवळ,पटेल चौक,सांगली.
फोन नं.(०२३३) २६२१०९६ मोबा.:९९६०४०६३१३

TEXMO
AQUATEX
अधिकृत विक्रेते
श्री वितराग एंटरप्रायझेस
सोन्या मारुती मंदिरासमोर, कोल्हापूर रोड, इचलकरंजी
फोन : (ऑ.) ०२३०/ २४३१०८
मोबा. : ● विपुल - ९३२६९५३०२७ ● बाबासाहेब : ९३२५७६१२२९


प्रोप्रा. अरुण किर्तीकुमार माणगावे
M/S. MANGAVE BOREWELLS
BOREWELL CONTRACTOR
Opp. Mangave Petrol Pump. Jaysingpur. Dist : Kolhapur (M.S.)
Ph. (02322) 229866. Mo. 9822551008/9422428266

Shree Datta
Prestrestess
M.f. PCC Pole
Shirol Road, Jaysingpur.

# महाराष्ट्र मागणार लवादाकडे दाद

नवी दिल्ली : कृष्णा खोरे पाणी विवाद लवादाने अलमट्टी धरणाची उंची वाढविण्यास कर्नाटकाला दिलेल्या परवानगीच्या विरोधात महाराष्ट्र सरकार दाद मागण्याच्या तयारीत आहे. याच निवाड्याच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा रेटा आंध्रात वाढू लागला आहे. याच मागणीवरून आंध्र पाठोपाठ महाराष्ट्रही याविरोधात न्यायालयात धाव घेण्याचा गांभीर्याने विचार करत असल्याचे सूत्रांनी 'सकाळ न्यूज नेटवर्क'ला आज सांगितले.

कृष्णा पाणी विवाद लवादाने नुकत्याच दिलेल्या निवाड्यात या नदीच्या अतिरिक्त पाण्याचे वाटप २०५० पर्यंत करतानाच अलमट्टीची उंची वाढविण्यास परवानगी दिली होती. या निर्णयानंतर सर्वांत कमी पाणी मिळालेला महाराष्ट्र शांत असला तरी आंध्रात मात्र खदखद सुरू झाली आहे. विशेषतः अलमट्टीबाबतच्या निकालाने आंध्रातील शेतकऱ्यांमध्ये असंतोष आहे. त्याविरोधात आंध्रात कालपासून शेतकऱ्यांची जोरदार निदर्शने सुरू आहेत. त्याचे कारण महाराष्ट्राच्या अगदी टोकाच्या विरोधी असले तरी अलमट्टीची उंची वाढवू नका, अशी आंध्रचीही मागणी आहे.

धरणाची उंची ५२४ पर्यंत वाढविली तर आंध्रातील भाग पाण्याविना ओसाड बनेल असा सूर तीव्र होत आहे. दर वर्षी जून व जुलैत अलमट्टीतून ८ ते १० दशलक्ष घनफूट पाणी सोडण्याचे बंधन लवादाने कर्नाटकवर घातले आहे. त्यानेही त्या बांधांचे समाधान झालेले सध्या तरी चित्र नाही. जनमताचा रेटा असाच वाढत राहिल्यास आंध्र सरकार सर्वोच्च न्यायालयात येणार हे निश्चित मानले जाते. तसे झाल्यास महाराट्राच्या दाव्यालाही भक्कम साथ लाभेल. कलम ५-३ अंतर्गत याच मागणीसाठी न्यायालय वा लवादाकडे धाव घेण्याचा गांभीर्याने विचार राज्य सरकार करत असल्याचेही या सूत्रांकडून समजते.

लवादाने तर अपिलासाठी याआधीच ९० दिवसांची मुदत देऊन ठेवली आहे. अलमट्टी धरणाच्या पाणी फुगवट्यामुळे २००५ मध्ये सांगली व साताऱ्याच्या काही भागांत हाहाकार उडविला होता. त्यामुळेच धरणाची उंची ५१९.६ मीटरच्या वर वाढविण्यास कर्नाटकला परवानगी देऊ नये, असे महाराष्ट्राने यापूर्वीदोनदा दिल्लीच्या पातळीवर मांडले आहे. सर्वोच्च न्यायालयातही हा मुद्दा सुनावणीसाठी आला तेव्हा न्यायालयाने कर्नाटकला धरणाची उंची वाढविण्यास मनाई केली होती. त्यानंतर न्यायालयाच्या आदेशानुसार, केंद्रीय जल आयोगाच्या तज्ज्ञांनीही सांगलीसह पूरग्रस्त भागाला भेट दिली होती. मात्र, तो पूर नैसर्गिक होता आणि अलमट्टीचे पाणी व पूर यांचा संबंध नसल्याचा निष्कर्ष त्यांनी काढला होता. लवादाने तोच ग्राह्य धरला असावा, असे मत व्यक्त होते. अलमट्टीचा पाणी फुगवटा राज्याच्या हद्दीत येत नाही, असेही या तज्ज्ञांचे म्हणणे होते.

E
vishal Yadav 9850291294
9921151199



इंडो प्रिंटर सर्व्हिसेस
Dot Matrix Specialist
■ EPSON, TVS, WEP., HP ■ Sales & Services ■ Dot Matrix, Laser, Inkjet Printer Repairs ■ Printers Carteridges & Toner Refilling
चालू स्थितीतील जुने प्रिंटर मिळतील.
९ वी गल्ली, सुभाष रोड, देमापुरे ऑईल मिलजवळ, जयसिंगपूर

श्री भरत अर्बन को-ऑफ बँक लि., जयसिंगपूर
ता. शिरोळ, जि. कोल्हापूर फोन : २२५४३०, २२५७२२ २२९९२३ फॅक्स नं. : ०२३२२ २२५७२३

■ २८ हजारांवर सभासद ■ संस्थापक, संचालक व्यवस्थापन ■ सर्व शाखा कार्यालये स्वत:चे इमारतीत ■ अद्यावत कॉम्प्युटर सेवा ■ सर्व शाखांकडे लॉकर्सची सोय ■ लाखापर्यंतच्या ठेवीस विमा संरक्षण देशातील प्रमुख ४८८ शहरांवरील डी.डी.ची अल्प कमिशनमध्ये सोय ■ बँक सतत नफ्यात ■ ज्येष्ठ नागरिकांसाठी ठेवीवर १/२ टक्के जादा व्याज ■ १० ग्रॅम चोख सोन्यास रु. १४००० कर्ज १० टक्के व्याजदराने

| ठेवी | कर्जे | ऑडिट वर्ग | | स्वभांडवल | गुंतवणूक | एन.पी.ए. |
|---|---|---|---|---|---|---|
| ४१४७.९५ | २१७८.७१ | ---- | नफ्यात | ४५५.१५ | २१८९.४३ | ३.३७ टक्के |

श्री. व्ही. बी. हुग्गे. बी. ए. बी. कॉम. चिफ एक्झि ऑफिसर
श्री. अशोक शां रूणवाळ. बी. कॉम व्हा. चेअरमन व सर्व संचालक
पै. विठ्ठल बाबूराव मोरे एम. ए. चेअरमन

# स्वाभिमानी ॲग्रो; एक आर्थिक दृष्टिक्षेप




## खासदार राजू शेट्टी

शेतकऱ्यांना वर्षभर काबाडकष्ट करून शेतात घाम गाळून, कच्चा शेतीमाल बाजारात विकून, बाजारपेठ, शासकीय धोरण, व्यापारी व दलाल यांच्याशी संघर्ष करून शेतीमालाला भाव मिळवावा लागतो. स्वाभिमानी शेतकरी संघटनेने शेतकऱ्यांच्या हितासाठी व त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी अनेक आंदोलने केली. शेतकऱ्यांच्या शेतीमालाला योग्य भाव मिळावा म्हणून प्रस्थापितांविरुद्ध अनेक वेळा दोन हात केले. दूध व ऊस आंदोलन करून त्यांच्या पदरात चार पैसे पडावेत, यासाठी संघटनेने प्रयत्न केला. तसेच यामध्ये संघटनेला मोठ्या प्रमाणात यशही मिळाले.

शेतीमालाला भाव न मिळण्याचे आणखी एक कारण म्हणजे शेतकऱ्यांना आपला कच्चा माल बाजारपेठेत विकावा लागतो. मात्र, त्याच कच्च्या मालावर प्रक्रिया करून विकणारे दलाल व व्यापारी श्रीमंत होतात. शेतकऱ्यांच्या पदरात मात्र जेमतेम पैसे पडतात. तसेच यामध्ये शेतकऱ्यांना मोठा तोटाही सहन करावा लागतो. शेतकऱ्यांना स्वत:ची बाजारपेठ कुठेच नाही. त्यामुळे शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात आर्थिक लूट होत आहे. तसेच बाजारातील तेजीचा फायदा शेतकऱ्यांच्यापेक्षा व्यापाऱ्यांनाच जास्त मिळत असतो. मात्र, मंदी आल्यास त्याचा थेट फटका शेतकऱ्यांनाच बसतो. म्हणून भविष्यात शेतकऱ्यांनासुद्धा शेतात पिकवलेला कच्चा माल थेट न विकता शेतातच त्यावर प्रक्रिया, ग्रेडिंग, पॅकिंग करून त्यांना अधिक पैसे मिळवता येऊ शकते. याच प्रयत्नाचा भाग म्हणून स्वाभिमानी शेतकरी संघटनेने स्वाभिमानी ॲग्रो फुड प्रोडक्टस ॲण्ड प्रोड्यूसर (उत्पादन करणारी उत्पादकांची कंपनी) ही शेतकऱ्यांची कंपनी स्थापन केली. या कंपनीची स्थापना करताना संकल्पना अशी, की गावातील कच्च्या मालावर गावातच प्रक्रिया करणे, त्याची प्रतवारी करून ते थेट ग्राहकांपर्यंत पोहचवणे होय. ही मध्यवर्ती संकल्पना समोर ठेवून कंपनीने जवळपास दीड कोटी भागभांडवल उभा केले. तसेच उर्वरित कर्ज घेऊन जवळपास २.५ कोटी रुपयांची शेतकऱ्यांची स्वत:ची कंपनी स्थापन केली. हे करत असताना अशी भूमिका घेतली, की ज्यांच्याकडे दूध आहे त्यांनी कंपनीला दुधाचा पुरवठा

पान ६ वर ▶

| दृष्टिक्षेप | | |
|---|---|---|
| अ. क्र. | तपशील | खर्च |
| १ | एकूण कर्ज | १ कोटी ६३ लाख |
| २ | भागभांडवल | १ कोटी ५० लाख |
| ३ | डेअरी प्रोजेक्टचा खर्च | २ कोटी ३५ लाख |
| ४ | दररोजचे दूध संकलन | ४१५०० लिटर |
| ५ | पॅकिंग दूध | २५००० लिटर |
| ६ | संकलन सुरू असलेली कार्यक्षेत्रे | शिरोळ, हातकणंगले, करवीर, कागल, राधानगरी, मिरज, पलूस, तासगाव, कवठेमहांकाळ, चिक्कोडी तालुका |
| ७ | दूध पॅकिंग विक्री केंद्रे | पुणे, बेळगांव, विजापूर, इचलकरंजी, सांगली, मिरज, जयसिंगपूर, शिरोळ, संकेश्वर, वडगाव, हुपरी, कुरुंदवाड, चिक्कोडी, निपाणी |
| ८ | कंपनीची इतर उत्पादने | स्वाभिमानी आम्रखंड, श्रीखंड, दही, चक्का, गाय तूप, लस्सी, बासुंदी, खवा, पनीर, मसाला ताक, सुंगधी दूध बाजारात उपलब्ध |
| ९ | दूध संकलन केंद्र | २५० |

# कोथळीतील शर्यतीत नाईक-निंबाळकर यांची बैलगाडी प्रथम

दानोळी : कोथळी (ता. शिरोळ) येथे नाताळनिमित्त झालेल्या बैलगाडी शर्यतीमध्ये इचलकरंजीच्या हर्षवर्धन नाईक-निंबाळकर यांच्या बैलगाडीने प्रथम क्रमांक पटकावून ५५ हजार रुपयांचे बक्षीस, शाल, श्रीफळ व ढाल मिळविली.

स्पर्धेचे उद्घाटन खासदार राजू शेट्टी यांच्या हस्ते झाले. या वेळी कोल्हापूरच्या महापौर सौ. वंदना बुचडे, कुरूंदवाडचे नगरसेवक अभिजित पाटील, पंचगंगा साखर कारखान्याचे उपाध्यक्ष धनगोंडा पाटील प्रमुख उपस्थित होते.

जनरल दुबैल गाडीच्या शर्यतीत ('अ' गट) द्वितीय क्रमांक सुहास जोंधळे (कळंब) यांनी तर तृतीय क्रमांक पाचगावच्या निवास गाडगीळ यांनी मिळविला. त्यांनी अनुक्रमे तीस हजार व पंधरा हजारांचे बक्षीस मिळविले.

'ब' गटातील जनरल दुबैल गाडीच्या शर्यतीमध्ये अनुक्रमे अरुण माने (दानोळी), पिंटू आरवाडे (कुरूंदवाड), शीतल पुजारी (कोथळी) यांनी क्रमांक पटकाविला.

घोडागाडी शर्यतीमध्ये अक्षय रजपूत (सांगली), हर्षवर्धन जाधव (डिग्रज) व ओंकार पाटोळे (कुपवाड) यांनी बक्षीस मिळविले.

या प्रसंगी सरपंच सौ. बेबीताई तांबोळी, उपसरपंच सौ. राजगोंडा पाटील, दिलीप पाटील, तंटामुक्त अध्यक्ष राजगोंडा पाटील, वृषभ पाटील, विजय खावटे, बाहुबली इसराण्णा आदी मान्यवर उपस्थित होते.

शर्यती यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी शैलेश तिवडे, नितीन वायदंडे, मधुकर तिवडे, अशोक तिवडे, सलीम निवडे, अशोक वायदंडे यांच्यासह वायदंडे व तिवडे ग्रुपच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.



# कोडणी परिसरात ऊस लावण सुरू

कोडणी : कोडणी, गायकवाडी परिसरात ऊस तोडणीच्या कामाबरोबरच आता ऊस लावणीच्या कामालाही वेग आला आहे. गेल्या तीन वर्षांपासून स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष खासदार राजू शेट्टी यांच्या आंदोलनामुळे उसाला समाधानकारक दर मिळाला आहे.

सध्या ऊस लावण करण्यासाठी रानाची नांगरट करून बांध घालणे, ट्रॅक्टरद्वारे सरी सोडणे आदी कामे सुरू आहेत. ८६०३२ या बियाणाला शेतकऱ्यांची अधिक पसंती आहे.

# स्वाभिमानी ॲग्रो; एक आर्थिक दृष्टिक्षेप

▶ पान ५ वरुन

करावा, नि ज्यांच्याकडे पैशाची अतिरिक्त बचत होते त्यांनी भागभांडवल खरेदी करावे. जेणेकरून त्या भाग भांडवलाच्या पैशातून दुधावर प्रक्रिया करून ते दूध शहरात नेऊन विकता येईल. याला ग्रामीण भागातल्या सर्व शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. घोषणा केल्यापासून केवळ दोनच महिन्यांत कंपनीचे भागभांडवल जमा झाले. ६ ते ७ महिन्यांत प्रकल्पाची उभारणी करण्यात आली. १५ जून २००९ रोजी स्वाभिमानी ॲग्रो फूड प्रोडक्टस ॲण्ड प्रोड्युसर कंपनी कार्यान्वित झाली. केवळ १५ महिन्यांत एवढा विनाकपात एकरकमी उच्चांकी भाव दिलेला आहे. बोनस देत असताना इतर दूध संस्थांच्या बोनसचा विचार करून अनेकांच्या तुलनेने जास्तीत जास्त दर देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे अवघ्या १५ महिन्यांत इतरांच्या तुलनेने लिटरला सर्वापेक्षा २५ पैसे जादा बोनस देता आले. हे केवळ अतिशय पारदर्शक व्यवस्थापन, चिकाटी, शेतकऱ्यांनी दूध घालून दिलेले पाठबळ, तसेच शेतकऱ्यांनी भागभांडवल दिल्यामुळे संस्थेवर व्याजाचा कमी पडलेला बोजा यांमुळेच घडले. तसेच यामुळे कंपनीचा उत्पादन खर्चही मर्यादित राहिला. केवळ त्याचमुळे सध्याच्या स्पर्धेच्या युगामध्ये अनेक वर्षे ज्यांनी आपले या व्यवसायात बस्तान बसविले आहे. त्यांच्याशी संघर्ष करीत आपले अस्तित्व टिकवता आले. त्यातूनच दूध प्रकल्प सुरू झाला.पहिल्या दिवशी म्हणजे १५ जून २००९ रोजी ३२०० लिटर दुधाचे संकलन झाले होते. आजअखेर ४२ हजार लिटरपर्यंत कंपनीचे दूध संकलन पोहचले आहे. हे सगळे संकलन सर्व स्वाभिमानीच्या दूध संकलन केंद्रामधूनच गोळा होते. तसेच पश्चिम भागातील शेतकऱ्यांच्या आग्रहास्तव भोगावती परिते येथे ३८ लाख रुपये खर्चून शीतकेंद्र सुरु केले. आगामी काळात अधिकाअधिक दूध संकलन करून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त दर मिळावा, यासाठी आमचा प्रयत्न राहणार आहे.

# ऊसक्षेत्र वाढल्याने यंदा गुळाचा हंगाम तेजीत

सांगली : उसाचे क्षेत्र वाढल्याने यंदा बाजारपेठेतही गुळाची आवक वाढली आहे. आठवडाभरात १० हजार १७६ क्विंटल आवक असून हंगामात आतापर्यंत ७ लाख ६३ हजार १५५ क्विंटल रवे तर ३ लाख ३५ हजार ६४ क्विंटल भेलीची आवक आहे. अजून चार महिने हंगाम असून यंदा विक्रमी गुळाची आवक होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, कांदा व भाजीपाल्याचे दर पुन्हा कमी झाले आहेत. गेल्या वर्षी साखेचे दर वाढल्याने शेतकऱ्यांच्या उसाला चांगला दर मिळाला. त्यामुळे उसाचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढले आहे. क्षेत्र वाढल्याने दराबाबत प्रश्न निर्माण झाला होता. मात्र, बहुतेक कारखान्यांनी प्रतिटन दोन हजार रुपये दर देण्यास सुरवात केली आहे. तरीसुद्धा गूळ निर्मितीकडेही अनेक शेतकऱ्यांचा कल आहे. गुळाला प्रति क्विंटलला किमान २००० हजार तर जास्तीत- जास्त ३ हजार २०० रुपये दर आहे. त्या शिवाय कारखान्यांच्या काटामारीत फटका बसण्यापेक्षा गूळ तयार करण्याकडे शेतकऱ्यांचा कल आहे. विशेषता कर्नाटकातील आवक जास्त आहे. आतापर्यंत ७ लाख ६३ हजार क्विंटल रवे तर ३ लाख ३५ हजार ६४ क्विंटल भेलीची आवक आहे. अजून चार महिने हंगाम असल्याने यंदा विक्रमी आवक होण्याची शक्यता आहे.

हळदीचा नवीन हंगाम पुढील महिन्यात सुरू होणार आहे. त्यामुळे सध्या आवक कमी आहे. सध्याच्या आठवड्यात केवळ २५५ क्विंटल आवक झाली. दराची तेजी मात्र कायम असून कमीत कमी १२ हजार ५०० तर जास्तीत-जास्त १८ हजार ५०० रुपये दर आहे. मिरचीची आवक ३१८ क्विंटल झाली कमीत-कमी ४ हजार ५०० तर जास्तीत जास्त ८ हजार रुपये दर मिळाला. सोयाबीनची आवक घटली असून ४०६ क्विंटल आवक झाली. दर १ हजार ९०० ते २ हजार २०० रुपये या दरम्यान आहेत. बेदाण्याच्या आवकेतही घट झाली आहे. दर मात्र स्थिर आहेत. धान्यात शाळूची आवक १ हजार ३७६ क्विंटल झाली. दर १ हजार ४०० ते २ हजार ५०० रुपये आहे.

गेल्या आठवड्यात कांद्याचा विक्रमी ७ हजार ५०० रुपये प्रति क्विंटलचा दर झाला होता. मात्र या आठवड्यात हा दर ६ हजार ४०० रुपयांपर्यंत खाली आला. बटाटा ८०० रुपये प्रति क्विंटल आहे. सफरचंद, बोरे, मोसंबी, संत्री या फळांची आवक चांगली आहे. नवीन द्राक्षाची आवक सुरू झाली आहे. पालेभाज्यात मेथी, करडई, कोथिंबीर, पालक आवक वाढल्याने यांचे दर कमी आले आहेत.



# बळिराजाला द्या अनुकूल बाजारपेठ



नवी दिल्ली : आगामी काळात गरीब शेतकऱ्याला जगवायचे आणि तगवायचे असेल तर आंतरराष्ट्रीय बाजारपेठ ते पंचायत समिती अशी व्यवस्था सगळ्या प्रकारचे अडथळे बाजूला करून उभी करावी लागेल. तसे झाले तरच ग्रामीण भागातील गरिबाला जगण्यासाठीचा आधार देता येणार आहे.

दुर्गम खेडेगावातल्या शेतकऱ्यालाही त्याचे शेतातील उत्पादन किंवा आदिवासींनी जंगलातून गोळा केलेले मध ते चांगल्या भावाने विकता येऊ शकेल, अशी बाजारपेठ नवीन दशकात ग्रामीण भागातील गरिबांसाठी उपलब्ध करून द्यावी लागेल. तरच दारिद्र्यरेषेखालील शेतकऱ्याला आशेचे किरण दिसू शकतील, असे स्पष्ट मत आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधी या संस्थेने (आयएफएडी) मांडले आहे.

शासकीय यंत्रणांना ग्रामीण भागातील गरिबांच्या हितासाठी सढळ हाताने मदत उपलब्ध करून द्यावी लागेल. यासाठी केवळ अन्नसुरक्षासारखे कायदे करून भागणार नसल्याचे स्पष्ट मतही 'आयएफएडी'ने या ताज्या अहवालात व्यक्त केले आहे. 'ग्रामीण भागातील गरीब : उद्याच्या पिढीसाठी नवे वास्तव, नवी आव्हाने, नवी संधी' या विषयावर दर दहा वर्षांनी अहवाल प्रकाशित केला जातो. २०११ चा अहवाल 'आयएएफ एडी'ने प्रसिद्ध केला आहे. या अहवालानुसार, प्रतिदिन १.२५ अमेरिकन डॉलरपेक्षा कमी उत्पन्न असलेले जगभरात शंभर कोटी गरीब आहेत. त्यापैकी ७० टक्के ग्रामीण भागात जगत आहेत. घाना, झिम्बाब्वे तसेच बिहारमधील कोणतेही खेडेगाव असो कृषी किंवा त्याच्याशी संबंधित उद्योगावरच ते अवलंबून असतात. २०५० पर्यंत गरिबांची संख्या वाढणार असल्याचा अंदाज 'आयएएफएडी'ने व्यक्त केला आहे.

ग्रामीण गरिबांना अन्नधान्य कसे काय उपलब्ध होणार, या प्रश्नाची उकल व्हावी या दृष्टीने या अहवालात मंथन करण्यात आले आहे. पुढील ४० वर्षांत कृषी क्षेत्रावरील भार वाढणार असून, गरीबच या खाली अधिक दबण्याची शक्यता आहे. त्यावर काय उपाययोजना कराव्यात, यासाठीचे मार्ग शोधण्याचा प्रयत्न यात करण्यात आला आहे.

छोट्या शेतकऱ्यालाही त्याचा माल बाजारात विकण्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठीची भक्कम व्यवस्था उभारावी. आंतरराष्ट्रीय बाजारपेठ ते पंचायत अशी ती जोडलेली असावी, अशी अपेक्षा या अहवालात व्यक्त करण्यात आली आहे. मोठ्या प्रमाणात सवलती देणे, माल वाहतुकीसाठी व्यवस्था करणे, अधिक गुंतवणुकीसाठी आर्थिक मदत करून देणे, नैसर्गिक आपत्ती, आजारपण अशावेळी शेतकऱ्याला खंबीर आधार दिला तरच सध्याच्या भांडवलशाही बाजारपेठेत तो तग धरू शकेल. घरखर्च, मुलांचे उत्तम शिक्षण, आजारपण आणि गुंतवणूक या मध्यमवर्गीयांना आवश्यक वाटणाऱ्या गोष्टी ग्रामीण भागातील गरिबांनाही सतावतात. त्या दूर करण्याकरिता या शेतकऱ्यांसाठी बाजारपेठ साखळी सुरू केली जावी. तसेच मोठमोठ्या कंपन्यांनी विकसनशील देशांमधील गरिबांसाठी मूलभूत काम करण्याची गरज व्यक्त करण्यात आली आहे.

लहान शेतकऱ्यांना प्रशिक्षण देणे, त्यांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्याबरोबरच विकसित देशांमध्ये प्रशिक्षण आणि सरावाची संधी देण्यासारखे पर्यायही सुचविण्यात आले आहेत. मॅक्डोनॉल्ड, नेस्टले यांनी 'सीएसआर' (कार्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबलिटी) अजेंडा राबविण्यासाठी चांगले प्रयत्न केले असल्याचे उदाहरण यामध्ये देण्यात आले आहे. अशा प्रकारे शेतकऱ्यांना बाजारपेठ उपलब्ध करून दिल्यास शेतमजुरांनाही नियमित काम मिळू शकेल. जागतिक मंदीचा परिणाम बँकांवर, उद्योगांवर, शेअर बाजारावर कसा झाला यावर चर्चा सुरू केली जाते. मात्र रोजगार हमी योजनांवर काम करणारे, दुसऱ्याच्या शेतात कापूस आणि शेंगा वेचायला जाणारे, अल्प भूधारक यांनी या मंदीच्या काळात पोट भरण्यासाठी काय कष्ट उपसले, याची देशोदेशीची उदाहरणे या अहवालात देण्यात आली आहेत. कमालीची चिकाटी असणाऱ्या या वर्गाचे कठीण परिस्थितीच्या काळातील व्यवस्थापनाचे 'आयएएफएडी'ने कौतुक केले आहे. शेतकऱ्यांच्या जमिनीवर खासगी समूहांचे अतिक्रमण, जागतिक तापमानवाढ, पाण्याचे असमान वाटप, रासायनिक खतांमुळे जमिनीचे झालेले नुकसान या मुद्द्यांचीही या अहवालात विशेष चर्चा करण्यात आली आहे.

# आंबा-विशाळगड रस्त्यासाठी साडेपाच कोटी : खासदार शेट्टी

आंबा, ता. ७ : आंबा-विशाळगड या ऐतिहासिक रस्त्याच्या विकासासाठी केंद्र शासनाने पाच कोटी पन्नास लाख रुपयांचा निधी मंजूर केल्याची माहिती खासदार राजू शेट्टी यांनी 'सकाळ'शी बोलताना दिली. थंड हवेचे पर्यटन स्थळ म्हणून आंबा तर ऐतिहासिक व धार्मिक स्थळ म्हणून विशाळगड प्रसिद्ध आहे. दोन्ही ठिकाणांना जोडलेल्या रस्त्याच्या रुंदीकरणासाठी, मोहरी उभारणीसाठी केंद्रीय मार्ग निधी (सीआरएफ) फंडातून निधी मंजूर झाला असून एप्रिल महिन्यात या रस्त्याचे बांधकाम सुरू होईल, असे श्री. शेट्टी यांनी सांगितले. हा रस्ता चौदा किलोमीटरचा असून तो विकसित झाल्यास विशाळगड भाविक, इतिहास प्रेमी, निसर्गप्रेमी पर्यटक याच्या दळणवळणास सोयीस्कर होणार आहे. या रस्त्यामुळे वाघझरा, भिवतळी, बाजीप्रभू जलाशय, आदिकी देवराई या पर्यटन स्थळांना जोडणारा मार्ग पक्का होईल.

दीड दशकापासून रस्त्याची सुधारणा व्हावी, अपघाती वळणीचे रुंदीकरण व्हावे, म्हणून आंबा, गजापूर परिसरातून मागणी होत होती.




जुन्या पिढीतील आशावादी राजकाररी आहेत ते! त्यांच्यावेळच्या ६४ कोटी रुपयांच्या भ्रष्टाचाराचा निकाल लागेल अशी त्यांना अजून आशा आहे.



# नव्या वर्षात साखर कडाडणार

नवी मुंबई : वायदे बाजाराला सोमवारपासून परवानगी दिल्याने नव्या वर्षात साखरेची चव कडू होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, त्यामुळे वायदे बाजारात अन्नधान्यास परवानगी नाकारावी, अशी मागणी मुंबई शुगर मर्चंट असोसिएशनने अर्थमंत्री व पंतप्रधानांकडे केली आहे.

नुकतेच कांदा, टोमॅटो, लसून या वापरातील जीवनावश्यक वस्तूंनी महागाईचा उच्चांक गाढला आहे. त्यातच सोमवारपासून वायदे बाजारालाही परवानगी देण्यात आली आहे. त्यामुळे इतर जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीही वाढण्याची शक्यता व्यापाऱ्यांनी वर्तविली आहे. याचा सर्वांत जास्त फटका साखरेला पडण्याची शक्यता आहे. सध्या वाशीतील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीतील अन्नधान्य मार्केटमध्ये साखरेच्या ५० ते ६० गाड्या येत आहेत, त्यामुळे साखरेचे दर ३० ते ३२ रुपये किलोपर्यंत स्थिर आहेत; मात्र वायदा बाजार खुला झाल्याने हे भाव वाढण्याची शक्यता आहे. प्रत्येक किलोमागे ५ ते १० रुपयांपर्यंत वाढ होऊ शकते, अशी माहिती मुंबई शुगर मर्चंट असो.चे अध्यक्ष अशोक तैन यांनी दिली आहे.

त्यामुळे ऐन नव्या वर्षाच्याच सुरुवातील साखरेची चव कडू होण्याची शक्यता आहे. यानंतर १५ दिवसांनी मकर संक्रांतीचा सण येणार आहे, त्यामुळे गोडधोड होणारच, यासाठी साखरेची मागणीही वाढणार आहे. त्यामुळे त्याचा परिणाम साखरेच्या किमतीवर होण्याची शक्यता व्यापाऱ्यांनी वर्तविली आहे.

# अलमट्टी धरणाची उंची वाढवण्यास लवादाची परवानगी



नवी दिल्ली : कृष्णा पाणी वाद लवाद प्राधिकरणाने आज दिलेल्या निवाड्यात अतिरिक्त पाणीसाठ्यापैकी महाराष्ट्राच्या वाट्याला ६६६ हजार दशलक्ष घनमीटर (टीएमसी) पाणी दिले आहे. हा निर्णय राज्याच्या दृष्टीने समाधानकारक असला तरी सांगलीसाठी धोकादायक ठरणाऱ्या अलमट्टी धरणाची उंची साडेनऊ मीटरने वाढविण्यास लवादाने दिलेल्या परवानगीमुळे कृष्णाकाठाला पुराच्या दहशतीखाली वावरावे लागणार आहे. त्यामुळे लवादाकडे पुन्हा दाद मागणार असल्याचे राज्याचे जलसंपदामंत्री रामराजे नाईक निंबाळकर यांनी सांगितले.

यापूर्वीच्या बच्छावत आयोगापेक्षा आज लवादाने दिलेल्या निवाड्यात महाराष्ट्राच्या वाट्याला ८१ टीएमसी वाढीव पाणी मिळाले आहे. मात्र, आंध्र प्रदेशला सर्वाधिक १००१ टीएमसी तर कर्नाटकला ९११ टीएमसी पाणी मिळणार आहे. कृष्णा पाणी वाद लवाद प्राधिकरणाने (केडब्ल्यूडीटी) दिलेला कृष्णेच्या पाणीवाटपाचा निर्णय हा संबंधित तिन्ही राज्यांवर २०५० पर्यंत बंधनकारक राहणार आहे. न्यायमूर्ती ब्रजेशकुमार यांच्या अध्यक्षतेखालील या लवादामध्ये न्या. डी. के. सेठ व न्या. एस. पी. श्रीवास्तव यांचाही समावेश होता. या सुनावणीत १२३ याचिकांची सुनावणी झाली. यात महाराष्ट्राची बाजू अॅड. टी. आर. अंध्यारुजिना व अॅड. दीपक नारगोळकर यांनी मांडली. आजच्या निवाड्यात कृष्णेच्या खोऱ्यातील ६५ टीएमसी पाणी विश्वासार्ह मानून त्याच आधारावर पाण्याचे वाटप करण्यात आले आहे. या निवाड्याचे पालन तिन्ही राज्ये काटेकोरपणे करतात की नाही, हे पाहण्यासाठी उच्चस्तरीय देखरेख समितीची स्थापना करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. कोयना धरणातील २५ अब्ज घनमीटर पाणी अतिरिक्त वीजनिर्मितीसाठी वापरण्यासही लवादाने परवानगी दिली आहे. यामुळे वीजनिर्मितीचा कालावधी साडेचार तासांवरून सहा तासांपर्यंत वाढविता येणार आहे. अतिरिक्त वीज निर्मितीबरोबरच मुंबई व कोकणासाठी हे पाणी वापरण्याबाबतच्या प्रकल्पासाठीही ते फायदेशीर ठरणार आहे.

या निवाड्यात लवादाने दोन हजार ५७८ अब्ज घनमीटर पाण्याचे वाटप केले आहे. तिन्ही राज्यांनी नदीच्या प्रवाहात १६ अब्ज घनमीटर पाणी कायम प्रवाहित ठेवावे, असेही नमूद केले असून, राज्याचा यातील वाटा तीन अब्ज घनमीटर आहे.

कृष्णा खोऱ्यातील पाणी वाटपाबाबत १९७६ मध्ये बच्छावत लवादाने पाणीवाटपाचे प्रमाण ठरविले होते. त्या निवाड्याची मुदत २००० मध्ये संपली होती. त्यानंतर तिन्ही राज्यांच्या विनंतीवरून २००४ मध्ये केंद्राने नव्या लवादाची नियुक्ती केली. आज त्याचा निकाल लागला.

## 'अलमट्टी'ची उंची वाढविण्यास विरोध

अलमट्टी धरणाची उंची वाढविण्यास महाराष्ट्राने तीव्र विरोध केला होता. मात्र, कर्नाटकने मांडलेली बाजू भक्कम ठरली व कर्नाटकला धरणाची उंची ५१९.६ मीटरवरून ५२४.२ मीटरपर्यंत वाढविण्यास परवानगी मिळाली. पाच , सहा वर्षांपूर्वी सांगली व सातारा जिल्ह्यांतील काही भागात 'अलमट्टी'च्या पाण्याने हाहाकार उडविला होता. त्यामुळे लवादाचा ताजा निर्णय चिंताजनक असल्याचे निंबाळकर यांनी मान्य केले. मात्र, त्याचवेळी धरणाचे दरवाजे पूर्ण बंद करून पाणी अडविण्यावरही लवादाने बंधने घातली आहेत हे त्यांनी लक्षात आणून दिले. 'अलमट्टी'मध्ये पाणी अडविण्याबाबत कर्नाटकला काही सूचना देण्याची मागणी महाराष्ट्र करेल. आकडेवारीत दिसत नसला तरी या निवाड्याचा फायदा महाराष्ट्राला निश्चितपणे मिळेल, असेही त्यांनी सांगितले.

# कोल्हापूरसह राज्यभर कांदा व्यापाऱ्यांवर छापे

कोल्हापूर : दोन महिन्यांत झालेल्या कांदा दरवाढीच्या पार्श्वभूमीवर साठेबाजी होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर प्राप्तिकर विभागाच्या अधिकाऱ्यांनी आज येथील शाहू मार्केट यार्डातील चार घाऊक व्यापाऱ्यांच्या कार्यालये व गोदामांवर छापे टाकले. चारही ठिकाणी रोजच्या खरेदी-विक्री व्यवहाराची तपासणी सहा तासांहून अधिक वेळ सुरू होती.

दरम्यान, कांद्याचा साठा केल्याबाबत तपास करण्यासाठी प्राप्तिकर विभागाने पुण्यासह नाशिक, लासलगाव, वाशी (मुंबई) या ठिकाणीही शुक्रवारी छापे घातले. पुण्यातील चार व्यापाऱ्यांच्या दुकानांची तपासणी करण्यात आली. कांदा महागल्याच्या काळात केलेल्या विक्री व्यवहाराची त्यांनी चौकशी केली. गुलटेकडी मार्केटयार्ड येथील कांदा-बटाटा विभागातील चार मोठ्या व्यापाऱ्यांकडे ही चौकशी करण्यात आली. कांद्याचे आगार म्हणून ओळखल्या जात असलेल्या लासलगाव (जि. नाशिक) येथील कांदा व्यापाऱ्यांसह राज्यातील इतर जिल्ह्यातील काही प्रमुख व्यापाऱ्यांवर प्राप्तिकर विभागाने छापे घातल्याने व्यापाऱ्यांत खळबळ उडाली होती. याबाबतची माहिती देण्यासाठी व्यापाऱ्यांनी फोन करून एकमेकांला सावध करण्याचाही प्रयत्न केला.

येथील शाहू मार्केट यार्डातील कांदा व्यापाऱ्यांकडे आज सकाळी सातपासून सौदे सुरू होते. दहा वाजेपर्यंत सौदे सुरू राहिले. याच वेळी प्राप्तिकर विभागाच्या पुणे कार्यालयाच्या दोन गाड्या बाजारात आल्या. यातील काही अधिकाऱ्यांनी येथील बन्सीलाल, मोहनदास, किशोर व चंदवाणी यांच्या कार्यालयांत कागदपत्रांची तपासणी



सुरू केली. या वेळी शेजारच्या काही व्यापाऱ्यांनी दुकाने बंद केली. बहुतांशी व्यापाऱ्यांकडे रोजचे व्यवहार सुरळीतपणे सुरू राहिले.

प्राप्तिकर विभागाच्या अधिकाऱ्यांच्या पथकाने येथील शिल्लक माल, सौदा झालेला माल तसेच गाडीत भरलेला माल व सौद्यात आलेले भाव याची माहिती घेतल्याचे व्यापाऱ्यांकडून सांगण्यात आले. दुपारी अडीच वाजेपर्यंत बन्सीलाल व किशोर यांच्या गोदामात अधिकाऱ्यांची दोन पथके तपासणी करत बसली होती.

येथील कांदा बाजारात कर्नाटक तसेच लोणंद, सातारा आदी भागातून कांदा विक्रीसाठी येतो. गेल्या दोन महिन्यांपासून येथील बाजारातील कांद्याचे भावही वाढले होते. येथील कांदा हा कोकण तसेच मराठवाडा व पुणे मुंबईकडेही पाठविला जातो. त्यामुळे येथील बाजारात कांद्याच्या भावालाही विशेष महत्त्व आहे. येथेही साठेबाजी झाली असावी, अशा अंदाजाने या भागातील व्यापाऱ्यांची आयकर विभागाने तपासणी केल्याची चर्चा येथे होती.

सावध करण्याचा प्रयत्न

कांद्याचे आगार म्हणून ओळखल्या जात असलेल्या लासलगाव (जि. नाशिक) येथील कांदा व्यापाऱ्यांसह राज्यातील इतर जिल्ह्यांतील काही प्रमुख व्यापाऱ्यांवर प्राप्तिकर विभागाने छापे घातले. त्यामुळे व्यापाऱ्यांत खळबळ उडाली होती. याबाबतची माहिती देण्यासाठी व्यापाऱ्यांनी फोन करून एकमेकांला सावध करण्याचाही प्रयत्न केला. यामध्ये उलट-सुलट माहिती देण्यात आली. यात शाहू मार्केट यार्डात वीस व्यापाऱ्यांची तपासणी झाल्याचे काही जण सांगत होते, तर काही जण कांद्याची साठेबाजी झाली आहे काय, याची तपासणी पणन विभागाकडून करण्यासाठी छापा घातला आहे, अशी चर्चाही होती.

### देशभरात छापासत्र

नवी दिल्ली : कांद्याची मोठ्या प्रमाणात साठेबाजी केल्याच्या तक्रारींवरून प्राप्तिकर खात्याने आज देशभरात व्यापाऱ्यांवर छापे घातले. या छाप्यांमधून तसेच चौकशीमधून काय निष्पन्न झाले, ते तातडीने समजू शकले नाही. उत्तर प्रदेशात लखनौ, कानपूर, बरेली, वाराणसी, मीरत आणि गाझियाबादसह इतरत्र बड्या साठेबाज व्यापाऱ्यांवर छाप्याची कारवाई करण्यात आली. पश्चिम बंगाल, पंजाब, गुजरात आणि बिहारमध्येही व्यापक प्रमाणात कारवाई करण्यात आली, असे प्राप्तिकर खात्याच्या प्रवक्त्याने सांगितले. सुरतमधील बाजार समितीतील कांदा-बटाट्याच्या पाच व्यापाऱ्यांवर छापे घालून कारवाई करण्यात आली. मुंबईहून आलेल्या अधिकाऱ्यांनी छाप्याची कारवाई सकाळपासूनच सुरू केली.

चंदीगड, पंजाब, हरियाना व जम्मू-काश्मीरमध्ये विविध ठिकाणी गोदामांवर आणि शीतगृहांवर छापे घालण्यात आले. लुधियाना, जालंधर, अमृतसर, फरिदाबाद, जम्मू या

पान १५ वर ▶